## दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.

[औंध संस्थानांत स्थापन झालेली; सभासदांची जबाबदारी नियमित]

रजिस्टर्ड ऑफिसः—औन्ध

हेड ऑफिसः—१११।११२ सदाशिव पेठ, सातारा

शाखाः—औन्ध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ३,२३,८२० |
| वसूल भांडवल | रु. | १,६१,९१० |
| एकूण रिझर्व्हज | रु. | ८७,२५० |
| खेळतें भांडवल | रु. | १८,००,००० |

सर्व तऱ्हेचे बँकेचे व्यवहार केले जातात.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.



REGISTERED No. B. 3434


# अर्थ


वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १६ मार्च, १९४९ अंक ११



उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

## ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठीं चौकशी कराः—

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३७५११

औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें

( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज्
( ले :-जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )

( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
( ले.:-जे. बी. टेलर, किं. १ रु. )

( ३ ) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट
( ले :-. रेवि अॅले, किं. २ रु. )



## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः मार्ऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ३०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३५,००,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—


श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर









तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## सर्व प्रसिद्ध माल

किर्लोस्कर नांगर, चरक, पंप, ऑईल एंजिन्स, इलेक्ट्रिक मोटर्स, शेंगा फोडण्याची हात व पॉवर यंत्रें.

| | |
|---|---|
| केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधु, (शाखा) मेनरोड, नाशिक. |

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**वनस्पति तुपांतील भेसळ**—वनस्पति तुपांत भेसळ करून तें विकण्यांत येत असतें. ही भेसळ थांबविण्यासाठी जरूर ते उपाय योजण्यासाठी स्थानिक व प्रांतिक अधिकाऱ्यांना मध्यवर्ती सरकारकडून सूचना करण्यांत आल्या आहेत असें समजतें. ह्या तुपांत एखादा रंग मुद्दाम मिसळून त्याची शुद्धता ओळखतां यावी म्हणून हिंद सरकार तजवीज करणार आहे. ह्यासाठीं चार-पाच तऱ्हेचे रंग तज्ञांकडून तपासविण्यांत आले; परंतु, ते आरोग्याला विघातक असल्याचें आढळून आल्यानें सरकारनें ते रंग वनस्पती तुपांत मिसळण्यास अयोग्य ठरविले आहेत.

**काठेवाडांत तेलाचा शोध**—सध्यां हिंदुस्थानांत फक्त आसाममध्यें व्यापारी दृष्टीनें फायदा होण्याइतकें तेल निघूं शकतें. १९४८–४९ सालीं कच्छ काठेवाड, आसाम आणि पूर्व पंजाब ह्या प्रांतांतून भूस्तरशास्त्रज्ञ तेलासाठी संशोधन करणार आहेत. हिंदुस्थानला दरवर्षी जितकें पेट्रोलिअम लागतें त्याच्या फक्त सात ते आठ टक्के तेल सध्यां देशांत उत्पन्न करण्यांत येतें.

**पाकिस्तानकडून कापसाचा पुरवठा**—गेल्या वर्षी पाकिस्तान आणि हिंदुस्थान ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें पाकिस्ताननें हिंदुस्थानला ६॥ लाख कापसाच्या गाठी देण्याचें कबूल केलें होतें. त्यापैकीं २॥ लक्ष गाठी कापूस अजून यावयाचा आहे. त्यासंबंधीं कराची येथें वाटाघाटी होऊन समाधानकारक निर्णय झाला, असें समजतें.

**वनस्पति तुपाची निर्यात**—हिंद सरकार आणि पाकिस्तान सरकार ह्यांच्यांत वाटाघाटी होऊन हिंद सरकारनें २,००० टन वनस्पति-तूप पाकिस्तानांत पाठविण्यासाठी निर्यातीचे परवाने देण्याचें कबूल केलें आहे.

**हिंदुस्थानसाठी जर्मन रेल्वे एंजिनें**—जर्मनीच्या अमेरिकन सेनेनें व्यापलेल्या भागांतील कारखान्यांकडून हिंदुस्थानसाठी १०० रेल्वेचीं एंजिनें पुरविण्याच्या करारावर नुकत्याच सह्या झाल्या. हिंदी रेल्वेसाठी अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांच्या कारखान्यांकडेही मागण्या नोंदविलेल्या आहेतच.

**सौराष्ट्र मधील कापडाच्या गिरण्या**—सौराष्ट्रांत कापडाच्या ९ गिरण्या आहेत. ह्या गिरण्यांतून ६ महिन्यांचें कापड शिल्लक असल्यानें ता. १५ मार्चपासून ह्या गिरण्या बंद पडण्याचा प्रसंग उद्भवला होता. तथापि हिंद सरकार आणि सौराष्ट्र सरकार ह्यांच्यांत वाटाघाटी होऊन ही आपत्ति टाळण्यांत आली आहे.

**माकडांचा उपद्रव**—बनारस शहरांत माकडांनीं फार उच्छाद मांडला आहे. ह्या माकडांना पकडून दूर सोडून देण्यासाठी म्हणून बनारस नगरपालिकेनें आपल्या अंदाजपत्रकांत १०,००० रुपये मंजूर केले आहेत.

**न्यूझीलंडकडून लोंकर**—न्यूझीलंडच्या सरकारनें हिंदुस्थानला निर्यात करावयाच्या लोंकरींत १०० टनांनीं वाढ केली आहे. आतां ४०० टनाऐवजीं ५०० टन लोंकरीची आयात करतां येईल. लोंकरीच्या आयातीला आयातीच्या परवान्याची जरूरी लागत नाहीं.

**निर्वासितांना मदत**—शेतकरी पेशाच्या निर्वासितांची सोय लावण्यासाठी हिंद सरकारनें बिकानेर आणि मत्स्य संघ ह्यांच्या सरकारांना अनुक्रमें ३४,००,००० रुपये आणि १०,००,००० रुपये मंजूर केले आहेत. बिकानेर संस्थानला दिलेल्या मदतीचा उपयोग ६,००० निर्वासित कुटुंबांना 'तगाई' कर्जे देण्यासाठी करण्यांत येणार आहे.

**मिठाची आयात**—आयातीच्या खुल्या परवान्यांत समाविष्ट जिनसांतून मीठ वगळण्याचा निर्णय हिंदुस्थान सरकारनें घेतला आहे. ह्या परवान्याप्रमाणें कापूस सोडून इतर कोणत्याही मालाची पाकिस्तानांतून हिंदुस्थानांत आयात करतां येते.

**पोलंड कोळसा देणार नाहीं**—स्वीडन, नॉर्वे आणि डेन्मार्क हीं राष्ट्रें अमेरिकेनें पुरस्कृत केलेल्या अटलांटिक करारांत भाग घेण्याचा विचार करीत आहेत. हीं तीनही राष्ट्रें आपल्या उद्योगधंद्यासाठी लागणारा कोळसा थोड्या-बहुत प्रमाणांत पोलंडकडून घेतात. पोलंडनें कोळसा पुरविण्याचें नाकारलें तर ह्या देशांना बरीच गैरसोय सोसावी लागणार आहे. अटलांटिक करारांत सामील झाल्यास आर्थिक दंडयोजना म्हणून पोलंडचें सरकार वरील राष्ट्रांना कोळसा पुरविणार नाहीं, असा संभव आहे. कोळसा ही वस्तु पोलंडच्या निर्यात-व्यापारांत महत्त्वाची आहे. वरील राष्ट्रांना कोळसा पुरविण्याचें नाकारल्यास पोलंडलाही दुसरी बाजारपेठ पहावी लागेल.


## शेतकी, कारखाना, उत्पादन.

**—: बँक ऑफ पूना लि. :—**

(शेड्यूल्ड बँक)

स्वतंत्र हिंदुस्तानला औद्योगिक वाढ व जास्त उत्पादन यांची जरूरी आहे. शेतकी अगर व्यापार, कारखाना अगर धंदा यांना लागणारा पैसा बँकाकडून पुरविला जातो.

**बँक ऑफ पूना लिमिटेडशीं व्यवहार करून बँकेची वेळींच मदत घ्या.**

**—: व्याजाचे दर :—**

**चालू खातें. : ½ टका.**
**सेव्हींग खातें. : १½ टका.**
**मुदतीच्या ठेवी : १ वर्ष २½ टक्के., ३ वर्षे : ३ टक्के.**

सेफ डिपॉझिट लॉकरची सोय. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. जास्त माहितीकरितां लिहा.

| | |
|---|---|
| मुख्य ऑफिस :— ४५५ रविवार पेठ, पुणें २. | गो. गं. साठे, ए. बी. आय्. (लंडन) मॅनेजर. |

# अर्थ

बुधवार, ता. १६ मार्च १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## रोख पैशाचा तुटवडा

### उद्योगधंद्यांपुढील आजचा महत्त्वाचा प्रश्न

लहान–मोठ्या उद्योगधंद्यांना आतां त्यांचे जवळील पैसा त्यांच्या व्यापास अपुरा पडूं लागला आहे. लहान दुकानदाराला पूर्वी जर १,००० रु. भांडवल पुरत असेल, तर त्याच्या कितीतरी पट भांडवलहि त्याला पुरें पडेनासें झालें आहे. तीच गोष्ट कारखान्यांची. जितका कारखाना किंवा व्यवसाय मोठा, त्या मानानें गुंतून पडलेल्या रकमाहि मोठ्या आणि त्यांच्या गरजाहि त्याच प्रमाणांत अधिक. रोख पैशाच्या ह्या तुटवड्याकडे आपल्या कित्येक कंपन्यांच्या अध्यक्षांनीं आपल्या वार्षिक समालोचनांत लक्ष वेधलेलें आपणांस आढळतें. त्यांच्या अडचणींचें दुसरेंहि एक बलवत्तर कारण आहे. जुन्या यंत्रसामुग्रीचे ऐवजीं नवीन बसविण्यासाठी चालू उत्पन्नांतून व बाजूस काढलेल्या घसाऱ्यांतून तरतूद करणें पूर्वी सहज शक्य होई. परंतु आतां जादा भांडवल जमविल्याखेरीज नवीं यंत्रें आणून बसविणें किंवा जुन्यांची अर्धनवीं करणें अशक्य प्राय झालें आहे आणि त्यामुळें कारखान्यांच्या उत्पादन-क्षमतेस बाध येऊं लागला आहे. जुन्या यंत्रांऐवजी नवीं बसविण्यांत एवढी अडचण, तर कारखान्याच्या विस्ताराची गोष्टहि काढणें सहाजीकच कठीण झालें असल्यास नवल नाहीं. मालांत मोठाल्या रकमा गुंतून पडत रहात असल्या कारणानें, प्रत्येकास रोख पैशाची गरज तीव्रतेनें भासते आणि त्यामुळें उधारीची सवलत कोणासच मिळूं शकत नाहीं. मजुरी, व्याज व इतर चालू खर्च मात्र रोखीनें भागवावा लागतो आणि त्यासाठीं बँकांकडे मागणी केली जाते. परंतु बँकाहि फारच सावधगिरीनें व्यवहार करूं लागल्या असल्यानें, कित्येक कारखान्यांवर रोकड पैसा उभा करण्यासाठी आपली कांहीं मालमत्ता विकण्याचा प्रसंग येऊन ठेपला आहे. मग त्यांत नुकसानी आली तर त्याला इलाज काय ? सध्याच्या आर्थिक परिस्थितींत नव्या जबाबदाऱ्या पत्करण्यास पुढें येणारे व्यवसायी फारसे नसल्याकारणानें, कारखान्याची तात्रेबंदी जिंदगी व्यवहारांत टिकण्यास अडचण निर्माण होणार आहे. कारखान्याची खरी किंमत त्याच्या उत्पादन-शक्तीवर अवलंबून असते. ती जुन्या पुराण्या लोखंड-पोलादाच्या व विटा चुन्याच्या मापानें होण्याची पाळी आली, तर कारखान्याचा टिकाव कसा लागणार ? मोठ्या कारखान्यांचा किफायतशीरपणा गृहीत धरला, तरीहि रोख पैशाची चिंता आज त्यांनाहि वाटत आहे. लहानमोठ्या सर्वच व्यवसायापुढें रोख रकमेचा प्रश्न कमी-अधिक तातडीनें उभा आहे. सर्व प्रकारचे खर्च वाढले आहेत आणि करांच्या स्वरूपांतहि रोख रकम कंपन्यांच्या तिजोरीबाहेर जात आहे. त्यामुळें चालू उत्पन्नांतून आवश्यक असलेल्या प्रमाणावर भांडवल संचय होणें अशक्य आहे. ही परिस्थिति सुधारण्यासाठी, भांडवलाचा संचय वाढण्यासाठी, करांचा बोजा कमी होण्यासाठी व उद्योगधंद्यांच्या भवितव्याबद्दल सर्वत्र वाटणारी चिंता नष्ट करण्यासाठी सरकारनें उपाययोजना करावी अशी हितसंबंधी लोकांची तातडीची मागणी आहे. उद्योगधंद्यांच्या इमारतीचे खरा पाया त्याच्या सातत्यावरील जनतेचा विश्वास हाच असल्या कारणानें, तो विश्वास वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करणें सर्वांच्याच हिताचें आहे. भरपूर जिंदगी असूनहि, खेळत्या भांडवलाच्या तुटीमुळें कित्येक वेळा गैरसमजास वाव निर्माण होतो, त्याचें वेळींच निराकरण झालें पाहिजे. हिंदी कंपन्यांपुढेंच हा बिकट प्रश्न उभा आहे असें नसून, इंग्लंडमधील अनुभवहि त्याच प्रकारचा आहे, असें तेथील कंपन्यांच्या वृत्तांतावरून दिसून येतें. परंतु तेथील सरकार, कारखानदार व जनता हीं सर्वच अधिक व्यवहारकुशल व दूरदर्शी असल्या कारणानें आणि त्यांची परंपरा खरी व्यापारी व राष्ट्रीय स्वरूपाची असल्यामुळें, ते आपणांस अवघड वाटणाऱ्या कित्येक प्रसंगांतून सहज निभावून जाऊं शकतात. गेल्या महायुद्धाच्या वेळचें त्यांचें उदाहरण ह्या बाबतींत मार्गदर्शक आहे. आपणांसहि अशाच गुणांचा अवलंब केला पाहिजे.

---

## हिंदुस्थानांतील गुळाचा धंदा

### नासधूस थांबविण्याची योजना

हिंदुस्थानांत गूळ इतिहासपूर्व काळापासून तयार करण्यांत येत आहे. ह्या धंद्याकडे सरकारनें विशेष लक्ष दिलेलें नाहीं तरी सुद्धा धंद्याची वाढ झाली आणि सध्या दर वर्षी जवळ जवळ ४०,००,००० टन गूळ तयार करण्यांत येत आहे. साखरेच्या उत्पादनापेक्षां गुळाचें हें उत्पादन चौपट आहे.

कापडाच्या धंद्याचे खालोखाल गुळाच्या धंद्यांत सर्वांत अधिक माणसें गुंतलेलीं आहेत. पण हा धंदा आज सर्वस्वीं अशिक्षित शेतकऱ्यांच्या हातांत आहे. हा शेतकरी पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीनेंच अजूनही गूळ तयार करीत आहे. अर्थातच धंद्यांतील नासधूस नाहींशी करणें, गूळ आरोग्याच्या तत्त्वांचें पालन करून करणें, गुळाच्या उत्पादनांत एकसूत्रता आणणें, इत्यादि सुधारणांकडे अजून कोणाचें विशेष लक्ष गेलेलें नाहीं. गूळ करण्यासाठी ऊंस गाळावा लागतो. उंसाचा रस करण्यासाठी लाकडी चरकाचाच अगदीं अलीकडच्या काळापर्यंत उपयोग करीत असत. गुऱ्हाळासाठी बैलांचा उपयोग करण्यांत येत असे. हल्लीं मात्र एंजिनांच्या साह्यानें चालणारे लोखंडाचे चरकच सामान्यपणें वापरण्यांत येतात. उंसाचा रस उघड्या काहिलींत उकळण्यांत येतो. काहिलीखालीं जाळ लावण्यासाठीं उंसाच्या चिपाडांचा उपयोग करण्यांत येतो. उकळण्याची क्रिया चालू असतांना रसांतील घाण वेगळी होते व मग ती काहिलींतून काढून टाकण्यांत येते, रस हळूहळू घट्ट होत जातो. तो पुरेसा घट्ट झाला म्हणजे बादल्यासारख्या भांड्यांतून तो भरण्यांत येतो. तो अधिक घट्ट झाला म्हणजे त्यांत कणी पडूं लागते. अशा रीतीनें रस पूर्ण थंड झाल्यावर त्याची ढेप बनते. ह्या ढेपा पोत्यांत गुंडाळून अगर तशाच बाजारांत पाठविल्या जातात. गुळाच्या धंद्यांत आतांपर्यंत फक्त

दोनच सुधारणा करण्यांत आलेल्या आहेत. पहिली म्हणजे लोखंडी चरकांचा आणि ते चालविण्यासाठी एंजिनांचा उपयोग. ह्या सुधारणांमुळें उसांतील रस अधिक प्रमाणांत काढतां येतो आणि गुळाचें उत्पादन वाढतें. दुसरी सुधारणा म्हणजे माल्टिपल फरनेसची उभारणी.

ह्या पद्धतीमुळें अधिक उंस लवकर गाळतां येतो आणि जळणही कमी लागतें. तथापि शेक कमीजास्त करणें, उकळण्याचा वेळ, रसायनांचा उपयोग अगर मळी काढणें ह्या बाबतींत नियंत्रण ठेवतां येणें, ह्याही पद्धतींत शक्य होत नाहीं सध्या गुळाच्या धंद्यांत सुधारलेली म्हणून जी यंत्रसामुग्री वापरण्यांत येते ती अगदींच यथातथा आहे. लोखंडी यंत्रचलित चरकांनीं उसांतील ६० टक्क्यांपेक्षां अधिक रस निघूं शकत नाहीं. ह्याचा अर्थ असा कीं, उसाच्या पिकापैकीं जवळ जवळ तृतियांश पीक अजूनही वाया जातें. आधुनिक पद्धतीनें चालविलेल्या साखरेच्या कारखान्यांत साखरेचा उतारा १२ टक्क्यांपेक्षां अधिक पडतो तर गुळाच्या धंद्यांत हा उतारा ९·६ टक्के पडतो. अशा रीतीनें शेतकरी वर्षभर खपून, खतपाणी घालून आणि पैसे खर्च करून जें पीक काढतो त्यांतील ३० टक्के पीक वायां जातें.

सध्या हिंदुस्थानांत अन्नधान्याचा तुटवडा आहे. अशा वेळीं अन्नाचा एकेक कण पिकविणें आणि तो टिकविणें ही फार अगत्याची बाब आहे. सरकार अधिक धान्य पिकविण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. तथापि ह्या प्रयत्नांना विशेष यश सत्वर येईलच अशी खात्री देता येत नाहीं. कारण पाऊस, हवामान, पिकांवर पडणारी कीड इत्यादिकांवर अजून मनुष्याचा ताबा नाहीं. अशा परिस्थितींत गुळासारखा अमूल्य आणि उत्साहवर्धक अन्नपदार्थ वायां घालविणें म्हणजे गुन्हा करण्यासारखेंच होत आहे. आपण सध्या ४०,००,००० टन गूळ तयार करतों. पण तो तयार करतांना १०,००,००० टन गूळ तयार होण्याइतका उसाचा रस वायां घालवितो. ह्यावरून ही नासधूस किती मोठ्या प्रमाणावर चालली आहे ह्याची कल्पना येईल. ती थांबविली तर गूळ स्वस्त होईल आणि ह्या गुळाची २,७०,०००,००० रुपये किंमत आपल्या पदरांत पडेल. ह्या रकमेचा उपयोग राष्ट्रसंवर्धक कार्यासाठीं करता येईल.

श्री एस. एल. फणसळकर, एम्. एस्. ( अमेरिका ), ए. आर. टी. सी. ( ग्लासगो ), ए. आर. आय. सी. ( लंडन ) ह्यांनीं जी नवीन सामग्री ह्या धंद्यासाठीं तयार केली आहे तीमुळें अधिकांत अधिक रस काढतां येऊन नासधूस अगदीं कमी होईल. उंस गाळण्यापासून तों ढेपी तयार होईपर्यंत सर्वत्र यंत्राचाच उपयोग करण्यांत आल्यामुळें मळी चांगली काढली जाते आणि गूळ एकाच दर्जाचा तयार होतो. सध्या यांत्रिक चरकाला फिरविण्यासाठीं डिझेल तेलावर चालणारें एंजिन लागतें. हें तेल अजून महाग व दुर्मिळ आहे. नवीन पद्धतींत उंसाचीं चिपाडें जाळून वाफेवर चालणाऱ्या एंजिनाचा उपयोग करण्यांत आलेला आहे. हें नवीन यंत्र वापरण्याला सोपें असून ज्या शेतकऱ्याजवळ २०० एकर उंस असेल त्याला अगर तितका उंस असणाऱ्या एखाद्या खेड्याला त्याचा उपयोग सहकारी पद्धतीनें करता येईल. श्री. फणसळकरांच्या कल्पकतेचा विस्तारपूर्वक परिचय नंतर करून देण्यांत येईल.

---

**प्राणिसंग्रहालयासाठीं पक्षी**—हिंदमधील प्राणिसंग्रहालयांना देणगी म्हणून झेकोस्लोव्हाकिआच्या प्राणिसंग्रहालयाकडून १०० पक्ष्यांची विमानानें रवानगी करण्यांत आली. विमान प्राग-अथेन्स-मुंबई ह्या मार्गानें हिंदुस्थानांत येणार आहेत.

## सहकारी कायद्यांत दुरुती

### ( १ ) बेटर फार्मिंग व को. फार्मिंग सोसायटी

मुंबई सहकारी कायद्याच्या अंमलबजावणींतील कांहीं अडचणी दूर करण्यासाठीं प्रस्तुत कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल मुंबई सरकारनें तयार केलें आहे. ह्या बिलाच्या २ ऱ्या कलमानें फार्मिंग सोसायटीची व्याख्या केली आहे. ह्या सोसायटीचे दोन प्रकार संभवतील: ( १ ) बेटर फार्मिंग सोयायटी, व (२) को. फार्मिंग सोसायटी. लागवडीच्या सुधारलेल्या पद्धतींचा अवलंब करणें हा सोसायटीचा प्रमुख उद्देश असेल, तर ती बेटर फार्मिंग सोसायटीच्या सदरांत जाईल. बेटर फार्मिंग सोसायटींतच पीक संरक्षण सोसायटीचा अंतर्भाव होईल. जमीन धारण करणारे लागवडीच्या संबंधांत प्रामुख्यानें सहकारी पद्धत अवलंबणार असतील, तर त्यांच्या सोसायटीची गणना कोऑपरेटिव्ह फार्मिंग सोसायटींत होईल.

### (२) कर्जदार सभासदाच्या जमिनीवर सोसायटीच्या कर्जाचा बोजा

कर्जदार सभासदांकडून सोसायटीनें कोणत्या प्रकारें बोजाच्या निर्मितीचा कागद घ्यावा, ह्याचा तपशील तिसऱ्या कलमांत सांगितला आहे. अर्जदार सभासदाच्या मालकीची जमीन असेल तर त्यानें ठराविक नमुन्याचा फॉर्म भरून दिला पाहिजे. अर्जदार स्वतःच्या जमिनीवर बोजा उत्पन्न करीत आहे आणि हा बोजा सोसायटी जें कर्ज देईल व तिचें जें कर्ज देणें होईल त्यासंबंधांत आहे, असें लिहून द्यावें लागेल. १९४८ चा दुरुस्त कायदा अंमलांत येण्यापूर्वीं सभासदानें कर्ज काढलें असल्यास त्यानें आपल्या जमिनीच्या बोज्याविषयीं वरीलप्रमाणें शक्य तितक्या लवकर कागद लिहून दिला पाहिजे. तसें करीपर्यंत त्यास सभासदत्वाचे हक्क उपभोगतां येणार नाहींत. हें कलम मुख्यतः रिसोर्स सोसायट्यांस लागू आहे.

### (३) ट्रायब्यूनलकडील अपिलें

१९४८ चा दुरुस्त कायदा १ एप्रिल, १९४८ रोजीं अंमलांत आला. परंतु बॉंबे को. ट्रायब्यूनलची नेमणूक १५ नोव्हेंबर, १९४८ पर्यंत होऊं शकली नाहीं. ह्या उशीरामुळें कोणाचें नुकसान होऊं नये ह्यासाठीं ट्रायब्यूनलकडे करावयाच्या त्यांच्या अपिलांची मुदत १५ जून, १९४९ पर्यंत वाढविण्यांत आली आहे.

### ( ४ ) फार्मिंग सोसायट्यांना ११ व्या प्रकरणाची माफी

सहकारी कायद्याच्या ११ व्या प्रकरणांतील सक्तीच्या तरतुदी फार्मिंग सोसायट्या नोंदतांना अगदीं काटेकोरपणें पाळण्याची आवश्यकता नाहीं असें सरकारास दिसून आलें आहे. ह्या तरतुदी पाळल्या नसतांहि कित्येक सोसायट्या नोंदण्यांत आलेल्या आहेत. ह्या सक्तीच्या तरतुदींची माफी देण्याची व नोंदलेल्या सोसायट्यांचे बाबत झालेल्या गैरकायदेशीरपणास कायदेशीरपणा देण्याची व्यवस्था ८ व्या कलमानें करण्यांत आली आहे.

---

**पंजाबांतील रस्ते**—पूर्व पंजाब सरकारनें प्रांतांतील दळणवळणाची सुधारणा करण्यासाठीं प्रत्येकी पांच वर्षांचे तीन कार्यक्रम मंजूर केले आहेत. त्यांपैकीं पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमालाच १०·१३ कोटी रुपये खर्च होणार आहे.

**मलेरिआ प्रतिबंधक उपायांची चर्चा**—सोव्हिएट रशिआच्या आरोग्यखात्यातर्फे नुकतीच एक परिषद भरविण्यांत आली. ह्या परिषदेंत जमलेल्या शास्त्रज्ञांनीं आणि डॉक्टर्सनीं हिंवतापावर करावयाच्या कांहीं नवीन उपायांची चर्चा केली.

हिंद पार्लमेंटांत

## बँकिंग बिलाची चर्चा

अकरा वर्षांपूर्वीं सर नृपेंद्रनाथ सरकार यांनीं हातीं घेतलेलें बँकिंग बिल दोन सिलेक्ट कमिट्यांतून तावूनसुलाखून निघून, तसेंच स्वतंत्र भारतांतील पार्लमेंटांत चर्चा होऊन अखेर फेब्रुवारी १७, १९४९ रोजीं संमत झालें. बँकिंग कंपन्यांबाबत हा नवा १९४९ चा कायदा १६ मार्च, १९४९ पासून अंमलांत आला आहे.

ह्या बिलानुसार बँकांबाबत मॅनेजिंग एजन्सी पद्धत रद्द करण्यांत आली; बँकांना व्यापार करावयास बंदी करण्यांत आली; बिल अमलांत आल्यापासून अथवा त्यानंतरहि खरेदी केल्यास ७ वर्षांहून अधिक काळपर्यंत बँकेला स्वतःचे उपयोगाशिवाय इतर स्थावर मिळकत ठेवण्यास बंदी; वसूल भांडवल व रिझर्व्ह बाबतच्या मर्यादा; शेअर्सच्या खरेदी–विक्रीबाबतच्या कमिशनबाबत मर्यादा; तसेंच बँकांच्या व्यवहाराबाबत तपासणी वगैरे बाबतींत रिझर्व्ह बँकेला बरेच अधिकार देण्यांत आले आहेत. हें काम करणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांना इतर सरकारी नोकरांप्रमाणें संरक्षणही देण्यांत आलें आहे.

बँकांच्या व्यवहाराबाबत आतांपर्यंत स्वतंत्र कायदा असा नव्हता. कंपनी कायद्यांत बँकांकरितां कांहीं निराळीं कलमें होतीं. इतर सर्व बाबतींत कंपनी कायद्याप्रमाणें चालावें लागत होतें. रिझर्व्ह बँक ॲक्ट आला; इंपीरिअल बँक ॲक्ट होता. पण या सर्वांचा मेळ घातला गेला नव्हता. तो प्रयत्न या नवीन बिलानें केला आहे. तरीही पण हें बिल मर्यादित स्वरूपाचें आहे. बँकांच्या सर्व शाखांचा, व्यवहाराचा यांत समावेश करण्यांत आलेला नाहीं. ह्या बिलाची व्याप्ती कंपनी कायद्यानुसार नोंदविलेल्या बँकांपुरतीच आहे. योग्य दिशेनें सुरवात झाली या दृष्टीनेंच या बिलाचें स्वागत करावयाचें आहे. “ एकीकडे महागाईचा पर्वत आहे; दुसऱ्या बाजूला मंदी-बेकारीची दरी आहे. असा हा अडचणीचा-संक्रमणाचा काळ आहे. अशा वेळीं देशाच्या आर्थिक व्यवहाराचीं सूत्रें हातीं असणाऱ्यानें अत्यंत काळजीपूर्वक मार्ग आखला पाहिजे. बँकिंग व अर्थविषयक प्रश्न यांचा सांगोपांग विचार आपण कांहीं अवधी नंतर करावा हें बरें.”–अर्थमंत्री डॉ. जॉन मथाई. हिंदुस्थानांत काम करणाऱ्या परदेशी बँकांना हा नवीन कायदा लागू असल्याचें अर्थमंत्र्यांनीं सांगितलें. तसेंच ज्या देशी कंपन्या व्यापार अगर मालाच्या उत्पादनांत गुंतल्या असून त्याकरितां दर्शनी ठेवी घेतात, त्या कंपन्यांचा समावेश ‘बँकां’त करण्यांत आला आहे.

इतर व्यवसायांत गुंतलेल्या मंडळींना यापुढें बँकांत नोकरी करतां यावयाची नाहीं. कित्येक डॉक्टर–वकील मंडळींनीं आतांपर्यंत बँका काढल्या, चालविल्या. यानंतर असें करतां येणार नाहीं. मध्यम वर्गांतील मंडळींकडून भांडवल घेऊन मोठमोठ्या बँका काढावयाच्या तर त्या पैशाची काळजी वाहण्याकरितां बँकांचे भरपगारी, भरपूर व सतत काम करणारे नोकर हवेत. कांहीं वेळ काम पाहणाऱ्या डॉक्टर-वकिलांना मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून यापुढें स्थान नाहीं, असा अर्थमंत्र्यांनीं खुलासा केला.

बँकेच्या शेअर-होल्डरनें मत देण्याची कमाल मर्यादा एकूण मतांच्या ५ टक्के ठरविण्यांत आली.

औद्योगिक कंपन्यांच्या शेअर्सवर कर्ज देण्याबाबत, त्या शेअर्समध्यें रक्कम गुंतविण्याबाबत या बिलानुसार निश्चित मर्यादा घालून दिल्या आहेत. मूळ बिलांतील ती कमाल मर्यादा २०% होती, ती सिलेक्ट कमिटीनें ४०% केली; श्री. टी. टी. कृष्णमाचारी यांनीं उपसूचना मांडून ती मर्यादा ३०% वर आणली. ही उपसूचना मंजूरही झाली.

बँकेनें प्रायव्हेट कंपनीला विनातारण कर्ज देण्याचे वेळीं प्रायव्हेट कंपनीच्या वतीनें कर्ज घेणारा मॅनेजिंग एजंट, किंवा त्याचा भागीदार किंवा कर्जाची हमी देणारा इसम बँकेचा डायरेक्टर असतां उपयोगी नाहीं.

ह्या बिलान्वयें कोठल्याही बँकेची तपासणी करण्याचा हक्क रिझर्व्ह बँकेला देण्यांत आला. रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टावरून बँकेचें कामकाज ठेवीदारांच्या हिताला अपायकारक पद्धतीनें चाललें आहे असें आढळून आल्यास, सरकार त्या बँकेचे व्यवहार थांबवून ती बंद करण्याबाबत रिझर्व्ह बँकेला सूचना देईल अशीहि व्यवस्था करण्यांत आली आहे. बँकांनीं कोणते व्यवहार करावेत करूं नयेत, याबाबत सल्ला देण्याचा रिझर्व्ह बँकेला हक्क देण्यांत आला आहे. बँकांना कर्जाचे रूपानें मदत करणें, तसेंच जरूर वाटल्यास एक बँक दुसऱ्या बँकेंत विलीन करण्याबाबतही रिझर्व्ह बँकेला अधिकार देण्यांत आले आहेत.

रिझर्व्ह बँकेनें प्रतिवर्षी सरकारला बँकांच्या व्यवहाराबाबत अहवाल सादर करावयाचा असून बँकिंगच्या व्यवहारांत सुधारणा कशा व कोणत्या पद्धतीनें करतां येईल याबाबत सूचनाहि करावयाच्या आहेत.

मूळ बिलांत बँकांच्या डिव्हिडंडबाबत ९ टक्क्यांची मर्यादा घालण्यांत आली होती. सिलेक्ट कमिटीनें हें कलम रद्द केलें. सर्वच कंपन्यांच्या डिव्हिडंडवर ६ टक्क्यांची मर्यादा घालणारें नवीन बिल येत असल्यानें त्यांत बँकांचा समावेश होतो असा अर्थमंत्र्यांनीं युक्तिवाद केला. सर होमी मोदी यांनीं री ओढली. श्री. कृष्णमाचारी यांनीं बँकांच्या व्यवहाराचें स्वरूप इतर औद्योगिक किंवा व्यापारी कंपन्यांहून निराळें असल्याचें दाखवून बँकांच्या डिव्हिडंडवर नियंत्रण पाहिजे असें प्रतिपादलें. प्रा. शहा यांनीं विमाकंपन्यांप्रमाणें बँकेच्या संचालक मंडळावर ठेवीदारांचे प्रतिनिधी पाहिजेत असा मुद्दा मांडला.

इंपिरिअल बँकेच्या राष्ट्रीयीकरणाबाबत सर्वच सभासदांनीं आग्रह धरला. राष्ट्रहिताचे दृष्टीनें ती बँक कार्य करीत नसून हिंदी उद्योगधंद्यांना मदत देत नाहीं; युरोपिअन व्यापाऱ्यांना सर्व मदत देते, असेंही सांगण्यांत आलें.

“ मी आपल्या बाहेर नाहीं,” असें सांगून अर्थमंत्र्यांनीं पुढें असेंही म्हटलें कीं, व्यापारी बँका हें राष्ट्रीयीकरण करण्याचें योग्य क्षेत्र आहे असें त्यांना वाटत नाहीं. बँकेचे व्यवहार ही एक नाजूक गोष्ट आहे. ती परस्पर संबंधांवर अवलंबून आहे. “इंपीरिअल बँकेची हल्लींची व्यवस्था व कार्यपद्धती मला स्वतःलाच पसंत नाहीं” असें सांगून डॉ. मथाई पुढें म्हणाले कीं, त्यांत सुधारणा कशा व कोणत्या करतां येतील (राष्ट्रीयीकरण नव्हे ), हिंदीकरण कसें होईल त्याबाबत चौकशी करून व्यवस्था करतो.

मोठाल्या बँका व त्यांच्या शाखा, तसेंच स्थानिक लहान बँका या सर्वांना सध्याच्या अर्थव्यवस्थेंत स्थान असल्याचें अर्थमंत्र्यांनीं सांगितलें. पुढेंमागें त्यामध्यें स्पर्धा सुरू होईल तेव्हां कायद्याचें नियंत्रण घालावें लागेल, हेंही त्यांनीं मान्य केलें.

औद्योगिक बँका, तसेंच शेतकी बँका यांचें स्वतंत्र क्षेत्र मोठें असून त्यांना लागणारा पैसा दीर्घ मुदतीचा असतो. त्याबाबत निराळी व्यवस्था करावी लागेल. सहकारी पतपेढ्यांना हें काम झेपणारें आहे असें आपल्याला वाटत नाहीं, असेंहि डॉ. मथाई यांनी सांगितलें,

## हिंद सरकारचें अंदाजपत्रक

( मा म. काळे )

हिंद सरकारच्या अंदाजपत्रकांतील मुख्य आंकडे, कर-माफी देणाऱ्या योजना व नवीन कर वाढीच्या योजना यांची माहिती गेल्या अंकांत दिली आहेच. अंदाजपत्रकावरून पुढील गोष्टी स्पष्ट होतात. ( १ ) मध्यवर्ती सरकारच्या कारभारांत काटकसर करतां येण्यासारखी आहे. श्री. कस्तुरभाई लालभाई यांच्या नेतृत्वाखालीं नेमलेल्या कमिटीच्या शिफारसींची अंमलबजावणी अद्याप झालेली नाहीं. खर्चांत शक्य तेथें काटकसर झाली असली तर अंदाजपत्रकाचें स्वरूप किंचित् तरी बदललें असतें. ( २ ) १९४८-४९ चे दुरुस्त आंकडे लक्षांत घेतां गेल्या सालीं केलेल्या अंदाजापेक्षा उत्पन्न व खर्च ह्या प्रत्येकाचे आकडे दुरुस्त अंदाजांत सुमारें ३१ ते ३२ टक्क्यांनीं वाढले आहेत. अंदाज व दुरुस्त आंकडे यांत इतकी मोठी तफावत कां पडावी ? अर्थमंत्र्यांनीं वाढलेल्या उत्पन्नाची व खर्चाची कारणमीमांसा केली आहे; परंतु ती पूर्णपणें पटत नाहीं. ( ३ ) भांडवलदारांना सवलती देणें व सामान्य गरीब नागरिकांवरील करांचें दडपण वाढविणें, असें नवीन कर-योजनेचें स्वरूप स्पष्टपणें दिसतें. यामुळें भांडवलदार वर्ग थोडासा समाधान पावला असला तरी सामान्य नागरिकाला अंदाजपत्रक आपलें जीवन जास्त दुःसह करणारें असें वाटतें. ( ४ ) भांडवलदार वर्गाला दिलेल्या सवलतींमुळें औद्योगिक भांडवल गुंतविलें जाणें व सरकारच्या धोरणावर त्या वर्गाचा पूर्ण विश्वास बसणें ह्या गोष्टी खरोखरच किती प्रमाणांत शक्य होतील, हें पुढील वर्षी येणाऱ्या अनुभवावरूनच दिसून येईल. ( ५ ) गरीब जनतेला त्रासदायक होणारी पोस्टाचे दर, सुपारी, कापड, टायर्स, साखर, इ.वरील कर वाढ न करतां सरकारनें १४ कोटी ७९ लक्ष रुपयांची कर सूट न देतां येणारी प्राथमिक तूट अन्य मार्गानें भागविली असती तर बरें झालें असतें ? ( ६ ) परराष्ट्रीय व्यापाराचे बाबतींत फाळणीमुळें, डॉलर टंचाईमुळें व महागाईविरुद्ध उपाय योजना म्हणून आयातीवरील बंधनें सैल केल्यामुळें कशा नवीन अडचणी निर्माण होत आहेत व त्यांना तोंड कसें द्यावें लागत आहे याची अर्थ-मंत्र्यांच्या भाषणावरून योग्य कल्पना येते. ( ७ ) पुष्कळशा देशांत युद्धोत्तर काळांत दिसून येणाऱ्या सामान्य अडचणी हिंदमध्यें आहेतच, परंतु त्या व्यतिरिक्त निर्वासितांचा प्रश्न व त्यांचें आपल्या अर्थ व्यवस्थेमध्यें मीलन, संस्थानांच्या विलिनीकरणामुळें वाढता खर्च, हिंद-पाक संबंधामुळें उपस्थित होणारे प्रश्न व नैसर्गिक आपत्तीमुळें तीव्रतर होणारी अन्नटंचाई इ. गोष्टींमुळें हिंदच्या, अडचणी जास्त वाढल्या आहेत. ( ८ ) लष्करी खर्च वाढतच आहे व कदाचित् परिस्थितीमुळें तो आणखीहि वाढवावा लागेल. ( ९ ) महागाईविरुद्ध उपाययोजना आखली गेल्यामुळें प्रांतांना पुनर्घटनच्या कार्यासाठी मदत व हिंद सरकारची पुनर्घटनेचीं कामें यांवर होणारा खर्च बराच मर्यादित करावा लागला आहे. ( १० ) परिस्थिति बिकट असली तरी पुढील वर्षी चालू सालापेक्षां खर्च सुमारें १२ कोटी रुपयांनीं कमी होणार आहे. ( ११ ) पुढील वर्षी ८५ कोटी रुपये कर्ज उभारण्याचा अर्थमंत्र्यांचा मानस आहे व हिंदच्या आर्थिक परिस्थितीबद्दल व भवितव्याबद्दल अर्थमंत्र्यांना पूर्ण विश्वास वाटत आहे. ( १२ ) शेतीव्यतिरिक्त बहुतेक औद्योगिक उत्पादन वाढत आहे व सर्वसाधारण किंमतींचा निदर्शक आंकडा ३८०·१ वर स्थिर होत आहे.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

*पॅलेस स्ट्रीट, सातारा*

शाखाः—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

सुदत ठेवीवरील व्याजाचे दरः

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ” | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ” | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन.


**THE TRAVANCORE OGALE GLASS MFG. CO. LTD., MANJUMMEL (ALWAYE)**

# NOTICE

The Sixth Annual General Meeting of the Shareholders of the Company will be held on Friday the 25th March, 1949, at 4 p. m. at the Registered Office of the Company at Manjummel (Glass Factory premises) to transact the following business:

1. To recieve and adopt the Directors' Report, audited Balance Sheet and Profit & Loss Account for the period ended 31st December 1948.
2. To elect two Directors in place of the retiring Directors, who retire by rotation according to Article 11 of the Articles of Association of the Company and are eligible for re-election and offer themselves as such.
3. To appoint auditors for the current year and fix their remuneration.

By order of the Board,

*For Ogale Brothers Limited,*

Shankar Rao P. Ogale

Managing Agents

Trivandrum.
25th Feb. 1949

The Share Transfer Books of the Company will be closed from 12th March to 26th March 1949, both days inclusive.

## विक्रीमालाच्या अग्निजन्य नुकसानीस सूट नाहीं काय?

प्राप्ती-कर कायद्याखालील महत्त्वाचा निवाडा

( श्री. स. वा. दातार. )

आगींत जळून गेलेल्या विक्रीच्या मालाची ( स्टॉक-इन-ट्रेड ) किंमत ही धंद्यांतील नुकसानी म्हणून धंद्यांतील वार्षिक प्राप्तींतून वजा घालण्यास प्राप्तीवरील कराच्या कायद्याची कांहीं हरकत आहे काय? असा प्रश्न पाटणा हायकोर्टापुढें मांडण्यांत आला होता.

करदार ( असेसी ) यांचा मुसार माल, ज्यूट व कापड यांचा व्यापार होता. आगीमुळें त्यांचा कांहीं विक्रीमाल जळून गेला होता. इन्कम्-टॅक्स-ऑफिसरनें प्रथम जेव्हां ह्या आगीमुळें नाश पावलेल्या मालाच्या किंमतीस सूट दिली नाहीं तेव्हांच करदार यांनीं सदर किंमतीची रक्कम प्राप्तींतून वजा घालावी अशी विनंती केली होती. परंतु त्या ऑफिसरचें म्हणणें पडलें कीं आगींत जळालेला माल ही भांडवलाची नुकसानी आहे. ती भांडवलाच्या खात्यावर मांडली पाहिजे. तिला प्राप्तींतून वजा घालता येणार नाहीं. यावर करदारांनीं अपील केलें. अपिलाचा निकाल असा लागला कीं, धंद्याच्या प्राप्तींतून जें नुकसान वजा घालावयाचें तें धंद्याच्या नित्य व्यवहारांतील अथवा कार्यक्रमांतील असावयास पाहिजे. अपघातानें लागलेली आग कोणत्याहि व्यवसाय-संबद्ध कार्यांतून निष्पन्न झालेली नाहीं. म्हणून त्या आगीमुळें झालेलें नुकसान हें भांडवली नुकसानच समजावयास पाहिजे. तें प्राप्तींतून वजा घालता येणार नाहीं. त्यावर करदारांनीं अपेलेट ट्रिब्यूनलकडे दुसरें अपील केलें. त्या अपीलांतहि आगीमुळें झालेली नुकसानी ही धंद्यांतील नुकसानी नाहीं, धंद्याच्या नित्याच्या कामांतून ही नुकसानी ओढवली नाहीं, यामुळें तिला सूट मिळणार नाहीं, असेंच मत ट्रिब्युनलनेंहि दिलें. सारांश, प्रथमपासून तीनहि निकाल करदार यांच्या विरुद्ध गेलेले होते ह्यावरून ह्या प्रश्नावरील दृष्टिकोन लक्षांत येईल.

अधिकारी वर्गाच्या दृष्टिकोनांत आणखी एक हट्ट विशेष होता. प्राप्ती-कराच्या कायद्यान्वयें आगीच्या विम्यासाठी भरलेले हप्ते खर्चांत जमा धरतां येतात. त्यामुळें नष्ट झालेल्या मालाबद्दल विमा कंपनीकडून मिळालेली नुकसानी धंद्याच्या प्राप्तींत जमा धरावयाचा सरकारला हक्क आहे असें अधिकारी वर्ग मानून चालतो. परंतु विमा कंपनीकडून न मिळालेली विक्रीमालाची नुकसानी अथवा विमा उतरविलेला नसल्यामुळें सोसावी लागणारी नुकसानी मात्र धंद्याच्या एकूण वार्षिक प्राप्तींतून वजा घालावयास अधिकारी तयार नव्हते.

पाटणा हायकोर्टानें स्पष्ट निकाल देऊन हा महत्त्वाचा प्रश्न नुकताच पुरा मिटविला आहे. आगीमुळें झालेलें विक्रीमालाचें नुकसान एकूण प्राप्तींतून वजा घालणें हायकोर्टानें न्याय्य ठरविलें असून असें नुकसान हें धंद्यांतीलच नुकसान होय असें ठाम मत प्रदर्शित केलें आहे. त्याचप्रमाणें, विमा कंपनीकडून मिळालेली नुकसान भरपाई ज्याअर्थी अधिकारी प्राप्तींत जमा धरतात त्याअर्थी विमा कंपनीकडून न मिळालेली अथवा विमा नसल्यामुळें सोसावी लागलेली नुकसानी वजा घालणें त्यांना क्रमप्राप्तच आहे असाहि हायकोर्टानें निकाल दिला आहे.

( ए. आय्. आर. १९४८ पाटणा ११९ )

### करवाढीपासून भाडेकरूंचें संरक्षण

इमारती, घरें किंवा जमिनी यांचेवरील वाढलेल्या करांचा बोजा भाडेकरूंवर पडूं नये यासाठी मुंबई सरकार बॉंबे रेंट्स, हॉटेल्स अँड लॉजिंग हाऊस रेट्स कंट्रोल कायद्यांत दुरुस्ती करण्याकरितां बिल मांडणार आहे.

स्थानिक संस्थांनीं इमारती, घरें किंवा जमिनी यांवर बसविलेले वाढीव कर भाडेकरूंकडून घेण्याची परवानगी या कायद्याच्या कलम १० नुसार मालकांना देण्यांत आली आहे. ३१ मार्च, १९४९ नंतर मुंबई शहरांत आणि इतर नमूद केलेल्या ठिकाणीं अशी केलेली करवाढ भाडेकरूंवर लादतां येणार नाहीं अशी तरतूद या दुरुस्ती बिलांत करण्यांत आली आहे.

नमूद केलेले इतर भाग तूर्त पुढील प्रमाणें आहेतः—कुर्ला म्युनिसिपल बरो, वांद्रा म्युनिसिपल बरो, पार्ले-अंधेरी म्युनिसिपल बरो, घाटकोपर-किरोळ म्युनिसिपल बरो, जुहु म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट, चेंबूर व्हिलेज, ठाणा म्युनिसिपल बरो, मालाड नोटिफाइड एरिया, कांदिवलि नोटिफाइड एरिया, बोरिवली नोटिफाइड एरिया, मुलुंड व्हिलेज, भायंदर व्हिलेज, अहमदाबाद म्युनिसिपल बरो, अहमदाबाद कॅन्टोन्मेंट, पुणें शहर म्युनिसिपल बरो, पुणें उपनगर म्युनिसिपल बरो, पुणें कॅन्टोन्मेंट आणि खडकी कॅन्टोन्मेंट.

---

**पायदळांत बंगाली लोकांना प्रवेश**—हिंदी लष्करांत भरती करण्यासंबंधीं हिंद सरकारनें स्वीकारलेल्या नव्या धोरणाला अनुसरून बंगालमधील लोकांना पायदळाच्या पथकांत प्रवेश करण्यास पात्र ठरविण्यांत आलें आहे.

---


## नोटीस

### दी बँक ऑफ औंध लिमिटेड

नोटीस देण्यांत येते कीं,

बँकेच्या भागीदारांची अकरावी साधारण सभा रविवार ता. ३ एप्रिल १९४९ रोजीं सकाळीं ९-३० ( स्टँ. टा. ) वाजतां बँकेचें हेड ऑफिस, १११-११२ सदाशिव पेठ, सातारा शहर येथें खालील कामाकरितां भरणार आहे.

१. ३१ डिसेंबर १९४८ अखेर संपलेल्या सालाबद्दलचा डायरेक्टरांचा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक व ऑडिटर यांचा रिपोर्ट स्वीकारून मंजूर करणें.

२. डिव्हिडंड† जाहीर करणें.

३. पाळीप्रमाणें निवृत्त होणारे डायरेक्टरांचे जागीं ( ते फेरनिवडणुकीस पात्र असलेले ) नवीन डायरेक्टरांची निवडणूक करणें.

४. नवीन सालाकरितां ऑडिटर यांची नेमणूक करणें व त्यांचें वेतन ठरविणें.

सातारा, २६ फेब्रुआरी १९४९

बोर्डाचे हुकुमावरून
वा. रा. वर्तक
मॅनेजिंग डायरेक्टर

वि. सू. :—बँकेची ट्रॅन्स्फर बुकें ता. ३-४-४९ ते १७-४-४९ अखेर दोन्हीं दिवस धरून बंद रहातील.

† डिव्हिडंड मंजूर झाल्यावर तें सोमवार तारीख १८ एप्रिल, १९४९ पासून दिले जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर पोस्टानें पाठविलीं जातील. **पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.**

## पूना कमर्शिअल हायस्कूल

### पालकांसाठी

सन १९४३ सालीं संकल्प करून, डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स-या संस्थेनें हें हायस्कूल स्थापन केलें. इंग्रजी ४ थ्या इयत्तेपासून सुरुवात करून यंदा एस्. एस्. सी.साठी विद्यार्थी प्रथमच पाठविले व संकल्पाप्रमाणें हायस्कूलचा प्रयत्न पूर्ण केला आहे.

व्यापारी शिक्षणाचा अभ्यासक्रम दुय्यम शिक्षणाच्या अभ्यासक्रमांतून शिकविण्याची आतां उत्तम सोय झाली असल्यानें पालकांनीं आपल्या पाल्यास हा उपयुक्त अभ्यासक्रम द्यावा व या अभ्यासक्रमाची उपयुक्तता समजून घ्यावी.

सरकारमान्य एस्. एस्. सी. चें सर्टिफिकेट मिळवीत असतांना बुककीपिंग, शॉर्टहँड, टाईपरायटिंग, पत्रव्यवहार, अशा व्यावहारिक उपयुक्त विषयांचें शिक्षण मिळूं शकतें. हा विद्यार्थी व्यापारी महाविद्यालयांत प्रवेश मिळवून उच्च शिक्षण घेऊं शकतो. उच्च शिक्षण घेणें न जमल्यास नोकरी उद्योगाकडे या विषयांचा उपयोग होतो.

आमच्या हायस्कूलमध्यें हें सर्व शिक्षण देण्याची तरतूद झालेली आहे. शाळेस सरकारी मान्यता आहे. स्वतःची इमारत आहे. उत्तम शिक्षकवर्गही आहे. तरी पालकांनीं या अभ्यासक्रमाची माहिती घ्यावी व योग्य तो फायदा घ्यावा. विशेष माहिती समक्ष.

वेळ सकाळीं ८-३० ते ११ सायंकाळीं ६ ते ९

५९४ बुधवार पेठ,
जिजामाता बागेचा कोपरा,
पुणें २

कृ. म. रानडे, बी. ए., बी. कॉम,
मुख्याध्यापक.

### कांहीं नवीं पुस्तकें

★ इनव्हेस्टर्स एनसायक्लोपेडिया, १९४८ (मेसर्स कोठारी आणि सन्स; शेअर, स्टॉक आणि एक्सचेंज ब्रोकर्स, मद्रास. किं. १५ रु.) ह्या १,२०० पृष्ठांच्या पुस्तकांत सुमारें १३०० जॉ. स्टॉ. कंपन्यांची माहिती दिलेली आहे. इनकमटॅक्स, ट्रॅन्सफर स्टँप ड्यूटी, स्टॉक एक्सचेंजचे नियम, सरकारी रोखे, इत्यादि बाबत भरपूर माहिती आहे. महत्त्वाच्या मॅनेजिंग एजन्सी फर्म्सची माहिती दिली आहे. महत्त्वाच्या धंद्यांची हकीकतहि दिली आहे.

**ब्रह्मदेशाची तांदुळाची निर्यात**—सध्यां ब्रम्हदेशांत चालू असलेल्या यादवी युद्धामुळें ब्रम्ही सरकारला तांदुळाची निर्यात नेहमीप्रमाणें करतां येत नाहीं. तरीसुद्धां गेल्या जानेवारी आणि फेब्रुआरी ह्या महिन्यांत त्या सरकारनें २,७०,००० टन तांदूळ निर्यात केला. ब्रम्हदेशाच्या व्यापारांत तांदुळाच्या निर्यातीला महत्त्वाचें स्थान आहे.

**हिंदुस्थाननें आणखी डॉलर्स विकत घेतले**—इंटर नॅशनल मॉनेटरी फंडांतून हिंदुस्थाननें रुपयांच्या बदला आणखी २,४१,८०,००० डॉलर्सची खरेदी केली आहे. एका वर्षांत हिंदुस्थाननें डॉलर्स विकत घेण्याचा हा सातवा व्यवहार आहे. हिंदुस्थाननें आतांपर्यंत ९,२४,८०,००० डॉलर्स विकत घेतले आहेत. हिंदुस्थाननें फंडाला दिलेली वर्गणी ४० कोटी डॉलर्सची आहे. ह्या वर्गणीपैकीं एका वर्षांत एक चतुर्थांशापेक्षां अधिक डॉलर्स हिंदुस्थानला घेतां येत नाहींत.

बेडेकर पापड

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.




कृष्णा शुगर मिल्स लि.
कृष्णा-कित्तूर
कन्फेक्शनरी सुरू झाली.
धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.
६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.
विशेष माहितीसाठी लिहा.
पोस्टः-कृष्णा-कित्तूर जिल्हाः-बेळगांव.
विंचूरकर अ‍ॅण्ड को. मॅनेजिंग एजण्टस्.

४९७ पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनी छापलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.